UFO digital cinema

Publication: Sakal
Date: 25/11/2017

सकाळ

# यूएफओचे नव्या रूपात पुन्हा टुरिंग टॉकीज

## दुर्गम भागात जाहिरातीसाठी डिजिटल पर्याय

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. २४ : गावोगावी जाऊन फिरते चित्रपटगृह नेऊन तेथील लोकांचे मनोरंजन करण्याचा काळ आता मागे पडला आहे. या फिरत्या चित्रपटगृहांवर आधारित 'टुरिंग टॉकीज' हा मराठी चित्रपटही काही वर्षांपूर्वी आला होता; परंतु सध्याच्या डिजिटायझेशनच्या युगात घरोघरी मोबाईल व टीव्ही पोचला असतानाही डिजिटल क्रांतीमध्ये मोठे योगदान असलेल्या यूएफओ मूव्हीजने उत्पादनाचे ब्रॅन्डिंग करण्यासाठी यूएफओ मूव्हीज व कारवान टॉकीज यांनी फिरत्या चित्रपटांचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. सध्या सुरू असलेल्या कृषिथॉन या प्रदर्शनाचे डिजिटल पार्टनर असलेल्या यूएफओचा स्टॉल यामुळेच शेतकरी कुतूहलाने बघत आहेत.

संपूर्ण देशात इंटरनेट पोचवून त्या माध्यमातून डिजिटल क्रांती करण्याचे स्वप्न बघून सरकार त्याप्रमाणे कार्यवाही करीत असल्याचे सांगितले जात आहे. पुढील वर्षभरात देशातील सर्व ग्रामपंचायती इंटरनेटने जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. देशाच्या अगदी दुर्गम भागात मोबाईल पोचल्याच्या जाहिराती केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर कृषिथॉन प्रदर्शनात फिरत्या व्हॅनद्वारे चित्रपट दाखविण्याचा स्टॉल थोडासा वेगळा वाटत आहे.

याबाबत कंपनीचे मुख्य विपणन अधिकारी सिद्धार्थ भारद्वाज म्हणाले, की आपल्या देशात ४३ हजार आठवडेबाजार भरतात. तेथील दर वर्षीची उलाढाल ५३ हजार कोटींची आहे. या आठवडेबाजारांमध्ये ग्रामीण भागातील बहुतांश लोक येत असतात. ग्रामीण भागात आजही पुरेशी वीज उपलब्धता व मोबाईलच्या रेंजचा मोठा प्रश्न असल्यामुळे टीव्ही, मोबाईल यांना मर्यादा आहेत. तसेच घरातील टीव्हीपेक्षा थिएटरमध्ये चित्रपट बघण्याचा आनंद काही वेगळाच असतो. या गोष्टींचा विचार करून यूएफओ व कारवान टॉकीज यांनी ग्रामीण भारतात माध्यमाचा प्रकाश पोचविण्यासाठी ही टुरिंग टॉकीज नव्या रूपात आणली आहे.




नाशिक : कृषीथॉन प्रदर्शनात यूएफओ मूव्हीजकडून मांडण्यात आलेला फिरत्या व्हॅनवरील पडदा.

आतापर्यंत १२ राज्यांमध्ये फिरत्या व्हॅनद्वारे नागरिकांना मोफत चित्रपट दाखविले जातात व त्या चित्रपटांच्या दरम्यान ब्रॅन्डच्या जाहिराती दाखवून माध्यमाच्या मुख्य प्रवाहापासून बाहेर असलेल्या नागरिकांपर्यंत ब्रॅन्डिंग केले जाते. त्यांनी आतापर्यंत महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान, पंजाब, हरियाना, बिहार, ओडिशा, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, कर्नाटक व तमिळनाडू या राज्यांमधील एक हजार ४०० खेडी निवडून तेथे ब्रॅन्डिंग केले जात आहे. ग्रामीण भागातील रहिवाशांची रुची ओळखून त्याप्रमाणे चित्रपट दाखविले जात असल्यामुळे ते बघण्यासाठी गर्दीही मोठ्या प्रमाणावर होते, असे श्री. भारद्वाज यांनी सांगितले.